राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत नगर परिषद वाशिम, जि. वाशिम येथील नारायणबाबा तलावास प्रशासकीय मान्यता व निधी वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०१९/प्र.क्र.८०/तां.क.२
नवीन प्रशासन भवन,१५ वा मजला,हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०७ मार्च,२०१९.

वाचा :-

१) मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद, जि. वाशिम, यांचे पत्र क्र. नपवा/कार्या-१७/बांध/५८८२/२०१९, दिनांक २०.०२.२०१९.

२) दिनांक ०६.०३.२०१९ रोजीच्या सुकाणू समितीच्या बैठकांचे इतिवृत्त.

प्रस्तावना -

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य योजनेंतर्गत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून सुरु केली आहे. या योजनेंतर्गत सर्वसाधारणपणे खालील कामांचा समावेश होतो.

१. तलावाच्या पाण्याचे प्रदूषण करणारे स्त्रोत निश्चित करुन प्रदुषण रोखण्यासाठी उपाययोजना करणे.
२. तलावात साचलेला आवश्यक घातक व ऑरगॅनीक गाळ काढणे.
३. तलावाची गुणवत्ता टिकविण्यासाठी,

अ. तलावातील अनावश्यक व उपद्रवी वनस्पती नष्ट करुन त्यांची वाढ नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना करणे.

ब. तलावातील जैविक प्रक्रियेव्दारे तलावातील पाण्याची गुणवत्ता सुधारणे.

क. किनारा सौंदर्यीकरण, हरित पटटा विकसित करणे, कुंपण घालणे, मनोरंजनासाठी बालोद्यान, नौकाविहार, कमी किंमतीची स्वच्छतागृहे इ.

४. जनसहभाग व जनजागृतीसाठी कार्यक्रम तसेच प्रदुषण रोखण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार करावयाच्या उपाययोजना.

या योजनेंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद यांच्यामार्फत सादर नगर परिषद वाशिम येथील नारायण बाबा तलावाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता व प्रथम हफ्त्यापोटी निधी मुक्त करण्याचे शासन विचाराधीन होते. त्या अनुषंगाने शासन पुढील निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :

१. राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद मार्फत सादर नगर परिषद वाशिम येथील नारायण बाबा तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धनासाठी सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सोबत जोडलेल्या " प्रपत्र अ" मध्ये नमूद केलेली कामे पूर्ण करण्यासाठी एकूण रुपये ३,५०,००,०००/- (रुपये एकूण तीन कोटी पन्नास लक्ष फक्त) इतक्या रकमेस खालील अटी व सोबत जोडलेल्या " प्रपत्र -ब" मधील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर मंजूर एकूण रकमेपैकी ८०% हिस्सा म्हणून राज्य शासन व २० % हिस्सा म्हणून सवेणी ग्रामपंचायत निधी उपलब्ध करुन देईल. सदर योजनेचा वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे राहील.

अ.क्र	हिस्सा	मंजूर निधी (रुपये)	अक्षरी मंजूर निधी
१	८०% राज्य हिस्सा	२,८०,००,०००/-	रुपये दोन कोटी ऐंशी लक्ष फक्त
२	२०% नगर परिषद हिस्सा	७०,००,०००/-	रुपये सत्तर लक्ष फक्त
	एकूण	३,५०,००,०००/-	रुपये तीन कोटी पन्नास लक्ष फक्त

अ. सविस्तर अहवालात नमूद केल्यानुसार तलाव पाण्याचे प्रदूषण होत असलेल्या पाणलोट क्षेत्रातील अनधिकृत वाहती प्रथमत: हटवून तदनंतरच इतर कामे राबविण्यात यावी

ब. एकूण मंजूर निधीपैकी नगर परिषद हिस्सा हा राज्य शासनामार्फत निर्गमित केलेल्या हिश्श्याच्या २०% याप्रमाणे प्रथमत: बँक खात्यात जमा करण्यात यावा.

क. उत्सवांच्या कालावधीत निर्माल्य वा मूर्त्यांचे विसर्जन वा तत्सम बाबींमुळे तलावातील पाण्याचे प्रदुषण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

२. राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत नगर परिषद वाशिम, जि. वाशिम येथील नारायण बाबा तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य हिश्श्यापोटी देय एकूण रुपये २,८०,००,०००/-(रुपये दोन कोटी ऐंशी लक्ष फक्त) पैकी प्रथम हप्त्यापोटी म्हणून रु. १,४०,००,०००/- (रुपये एक कोटी चाळीस लक्ष फक्त) एवढी रक्कम यांना वितरित करण्यास शासन निर्णयातील "प्रपत्र -ब" मधील सर्व मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्तीच्या अधीन राहून या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

३. यासाठी मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद (Chief Officer, Washim Municipal Corporation) यांचे नांवे रुपये १,४०,००,०००/- (रुपये एक कोटी चाळीस लक्ष फक्त) एवढया रकमेचा धनादेश काढण्यात यावा. .

४. मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद यांना अदा करावयाची रुपये रुपये १,४०,००,०००/- (रुपये एक कोटी चाळीस लक्ष फक्त) इतकी रक्कम अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्रीम. शिल्पा चं. शिर्के,कार्यासन अधिकारी, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. सु. कि. निकम, उप सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद यांना रुपये रुपये १,४०,००,०००/- (रुपये एक कोटी चाळीस लक्ष फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाव्दारे वितरित करण्याची कार्यवाही करावी.

५. सदर प्रयोजनार्थ होणारा खर्च हा मागणी क्र. यू-४, ३४३५ परिस्थितिकी व पर्यावरण ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना -राज्य योजनांतर्गत योजना, (०२),पर्यावरण प्रतिबंध, (०२) (०७), राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१८२), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या मुख्य- लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वर्षात अर्थसंकल्पित रु. २५ कोटी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली वर्गीकृत करण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद क्र.७ ते १८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच प्रमाणित करण्यात येते की, दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्टातील अनु.क्र. ३ व ८ मधील अटींची पूर्तता होत आहे.

६.अ) तसेच सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं -२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. याशिवाय, वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दि.१० मे, २०१६ अन्वये खालील बाबींची पुर्तता होत आहे.

१. विभागास प्रदान वित्तीय अधिकार, सदर प्रस्तावास नियोजन विभागाची मान्यता घेण्यात आलेली आहे.

२. नगर परिषद वाशिम येथील नारायण बाबा तलावाच्या प्रस्तावासाठी एकूण ३,५०,००,००० (तीन कोटी पन्नास लक्ष फक्त) एवढया निधीमधील राज्य हिस्सा रुपये २,८०,००,०००/-(रुपये दोन कोटी ऐंशी लक्ष फक्त) पैकी प्रथम हप्त्यापोटी म्हणून रु. १,४०,००,०००/- (रुपये एक कोटी चाळीस लक्ष फक्त) इतका निधी प्रथम हप्त्यापोटी प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात येत आहे.

३. सदर तलावास मागील तीन महिन्यात कोणताही निधी मुक्त करण्यात आलेला नाही.

४. "मागणी क्र.यु-४, ३४३५-परिस्थितिकी व पर्यावरण, ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण,१०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२) (०७), राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१८२), ३१,सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)"या मुख्य लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

८. उपरोक्त शासन निर्णयामध्ये वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २ एप्रिल, २०१८ अन्वये ३१ वेतनेतर सहायक अनुदाने या बाबी खालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील नमूद अटींची पूर्तता करण्यात आली आहे. मूळ शासन निर्णयातील मुद्दा क्र. ७ नंतर खालील अटींचा समवेश करण्यात आला आहे :-

९. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २ एप्रिल, २०१८ सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनुक्रमांक १,२,३,५,६,७ या प्रकरणी लागू नाही. तसेच सदर परिशिष्टातील अनुक्रमांक ४ बाबत नमूद करण्यात येते की नियोजन व वित्त विभागाची सहमती घेण्यात आली आहे.

१०. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकासोबत दि. २ एप्रिल, २०१८ रोजीच्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.८ तपासणी सूचीमधील अनुक्रमांक १, २, ४ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींची पूर्तता होत आहे. तसेच तपासणी सूचीमधील अनुक्रमांक ३ व अनुक्रमांक ५ ते १० या प्रकरणी लागू नाही.

११. नगर परिषद वाशिम यांच्याकडून पर्यावरण विभागास कोणतेही येणे बाकी नाही.

१२. तसेच उपरोक्त शासन निर्णयाच्या "अ" मधील परिच्छेदातील ६, ७, ८, ९ या बाबी लागू नाहीत.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०७१८१५३९४७०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Shuddhodhan D Aher

Digitally signed by Shuddhodhan D Aher
DN: CN = Shuddhodhan D Aher, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Environment Department
Date: 2019.03.07 18:18:30 +05'30'

शु. द. आहेर ,
उप सचिव ,पर्यावरण विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र १/२,मंबई/ नागपूर.
४. जिल्हाधिकारी, जिल्हा कार्यालय, वाशिम
५. आयुक्त तथा संचालक नगरपरिषद संचालनालय, मुंबई.

६. मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद, जि.वाशिम
७. अधिदान व लेखा अधिकारी, मंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. मा.मंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
१०. मा.राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
११. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मंबई.
१२. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मंबई.
१३. वित्त विभाग (कार्यासन क्रमांक व्यय-१६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.
१४. नियोजन विभाग, कार्यासन क्र.१४७२, मंत्रालय, मंबई.
१५. रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवडनस्ती.

शासन निर्णय क्र.रासयो-२०१९/प्र.क्र.८० /तां.क.२, दिनांक ०७ मार्च,२०१९ सोबतचे सहपत्र

प्रपत्र-अ"

नगर परिषद वाशिम, जि. वाशिम येथील नारायण बाबा तलाव

	Description	
Item No	**Core Work**	**Amount**
1	CLEANING AND DE WEDING OF OLD RETAINING WALL	25,000.00
	Area 2500 cum	
2	PROVIDING EMANKMENT OF GABION WALL (SHORELINE DEVELOPMENT) 1 NO. =1.0 x 1.0x1.0M (450*2=900+900+450+450=2700 CuM) With soling and coping Etc	90,00,000.00
3	STONE PITCHING / BUND STRENCTHING	10,00,000.00
4	CONSTRUCTION OF RCC / STONE MASSONARY CURB (SAFTY WALL) AROUND LAKE	20,80,000.00
5	PROVIDING TOILET BLOCK	5,00,000.00
6	CONSTRUCTION OF STORM WATER DIVERSION CHANNEL AROUND LAKE	22,50,000.00
7	GARDEN, PARKING, BACKFILLING & LANDSCAPING ETC.	70,00,000.00
8	HANDRAILING AT PERIPHERI OF THE LAKE	16,00,000.00
9	CONSTRUCTION OF CHAIN LINK FENCING ALONG THE PERIPHRI OF LAKE	38,40,000.00
	TOTAL CORE WORK	**2,72,95,000.00**
	NON –CORE WORK	
1	PATHWAY OF PAVOR BLOCK	15,00,000.00
2	PROVIDING & FIXING BENCHES & GATES	
	Benches of cement concrete (50)	7,50,000.00
	Gates	1,00,000.00
3	PROVIDING SOLAR SYSTEM	
	Solar Light (50 Nos)	20,00,000.00
	Solar Pump (1 Nos) & Water network	5,00,000.00
4	FOUNTAIN on Solar (CENTER OF THE LAKE)	10,00,000.00
5	ENV. AWARENESS AND PUBLIC PARTICIPATION	
a	Creating and fixing monuments for environmental awareness as site	2,00,000.00
b	Providing dustbin about 10 Location	1,00,000.00
6	QUALITY CONTROL	2,00,000.00
	TOTAL NON CORE WORK	63,50,000.00
	Total core work + Non - core work	3,36,45,000.00
	Add 1% for Insurance	3,36,450.00
		3,39,81,450.00
	Add work contingency 3%	10,19,443.50
	Grand Total	**3,50,000893.5**
	Say Rs :- Three crore Fifty lacks only	**3,50,00000.00**

Shuddhodhan D Aher

Digitally signed by Shuddhodhan D Aher
DN: CN = Shuddhodhan D Aher, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Environment Department
Date: 2019.03.07 18:18:45 +05'30'

शु. द. आहेर

उप सचिव ,पर्यावरण विभाग

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्र. रासयो -२०१९/प्र.क्र.८०/तां.क.२, दिनांक ०७ मार्च , २०१९ सोबतचे प्रपत्र

"प्रपत्र-ब"

राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत नगर परिषद वाशिम, जि. वाशिम येथील नारायण बाबा तलावाच्या संवर्धन कामांसाठीच्या अटी व शर्ती

१. प्रपत्र -अ" मधील नमूद कामांना प्रथमत: तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन घेण्यात यावी. योजनेच्या प्रत्येक टप्प्यात हाती घेण्यात येणा-या कामाचे मंजूर तांत्रिक आराखडे, अंदाजपत्रके, नकाशे, संकल्पचित्रे इ. शासनाकडे काम सुरु करण्यापूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. शासनास उपरोक्त माहिती सादर केल्यानंतरच कामे सुरु करण्यात यावीत. हाती घेण्यात यावयाच्या ("प्रपत्र-अ" मधील नमूद कामे) कामासंबंधित तलावाच्या सद्यस्थितीची छायाचित्रे घेण्यात यावी. तसेच व्हीडीओ रेकॉर्डिंग करण्यात यावे. कामांच्या प्रगतीनुसार दर दोन महिन्यांनी याप्रकारे छायाचित्रण करण्यात यावे.

२. तलाव संवर्धन क्षेत्रात तज्ञ व कामाचा अनुभव असलेली तसेच "प्रपत्र-अ" नुसार मंजूर खर्चाच्या बाबी संबधीत तज्ञ व पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ असलेली संस्था /शासकीय प्राधिकरण/मंडळ यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था म्हणून मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद यांनी विहित पध्दतीने नियुक्ती करावी. ही संस्था "प्रपत्र-अ" नुसार मंजूर खर्चाच्या बाबींचे स्थानिक डी. एस. आर. प्रमाणे खर्चाचे अंदाज, कामाचे आराखडे तयार करणे व तपासणे कामाची गुणवत्ता राखणे, सर्व कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करणे याबाबत वेळोवेळी समन्वय करेल. नगर परीषदेने प्रकल्पासाठी तांत्रिक मनुष्यबळ तयार होण्यासाठी या संस्थेचा उपयोग करावा.

३. शासनाने वितरित केलेल्या निधीच्या विहित प्रमाणात मुख्यधिकारी, चिपळूण नगर परिषद यांनी त्यांचा अनुज्ञेय हिस्सा खात्यात जमा करावा. सदर हिस्सा प्रकल्पावर खर्च केल्याशिवाय तसेच, प्रकल्पांतर्गत होणा-या कामांचे गुणवत्ता लेखापरिक्षण केल्याशिवाय पुढील हप्ता मुक्त करण्यात येणार नाही.

४. कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याची व कामाची गुणवत्ता राखण्याची संपूर्ण जबाबदारी ही मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद यांची असेल. सदर प्रकल्पाच्या कामासाठी लागणारा निधी खर्च करताना मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद यांच्या देखरेखेखाली करण्यात यावा.

५. प्रकल्पाची यथायोग्य अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून प्रकल्प अंमलबजावणी समितीची मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात यावी. या समितीत नगर परिषदेतील संबंधित अधिकारी, कर्मचारी, पर्यावरण विषयक तज्ञ, उपरोक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी यांच्यासह नगर परिषदेस आवश्यक वाटतील अशा प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा. ही समिती प्रकल्पांतर्गत होत असलेल्या सर्व कामकाजाचे सनियंत्रण करेल व कामांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवेल. सदर समितीची आढावा बैठक दर महिन्याला अयोजित करण्यात यावी.

६. प्रकल्प पूर्ण झाल्यावरही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या मदतीशिवाय तलावाचे संवर्धन होणे गरजेचे असल्याने योजनेची कामे पूर्ण झाल्यावरही ही समिती बैठका आयोजित करेल. ही समिती भौतिक बाबींची देखभाल, प्रकल्पांपासून मिळणारे उत्पन्न, प्रकल्प संवर्धनासाठी उपाययोजना व खर्च याबाबत आढावा घेत राहील.

७. काम पूर्ण झाल्यावर किमान पुढील १० वर्षापर्यंत तलावाची देखभाल व दुरुस्ती नगर परिषदेने स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच नगर परिषद प्रकल्प अंमलबजावणी समितीचा अहवाल प्रत्येक ६ महिन्यांनी शासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करेल.

८. तलावाच्या पाण्याची गुणवत्ता चालू महिन्यापासून पुढे प्रत्येक महिन्याला तपासण्यात यावी. पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ प्रयोगशाळेची /संस्थेची /मंडळाची नियुक्ती करण्यात यावी. दर महिन्याचा पाण्याच्या गुणवत्तेचा अहवाल सदर संस्था प्रकल्प सनियंत्रण समितीस व पर्यावरण विभागास दर तीन महिन्यांनी सादर करेल.

९. उपरोक्त मुद्यानुसार केलेल्या कार्यवाही प्रमाणे मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद हे शासनास दर तीन महिन्याला खालील अहवाल सादर करतील.

अ. मंजूर कामांचा भौतिक प्रगती अहवाल
ब. पाण्याच्या गुणवत्ता अहवालाच्या प्रती
क .प्रकल्प सनियंत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
ड खर्चाचे प्रत्येक तिमाहीचे उपयोगिता प्रमाणपत्र

१०. सदर अहवाल सादर केल्याशिवाय कामाच्या पुढील टप्प्यातील निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. तसेच आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष संपल्यानंतर एप्रिलच्या १० तारखेपर्यंत पर्यावरण विभागास सादर करावे. उपरोक्त मंजूर योजनेसाठी निधी उपलब्धतेनुसार अनुदान मुक्त करण्यात येईल.

११. योजनेंतर्गत मंजूर विशिष्ट कामासाठी अदा केलेली वा मान्य केलेली रक्कम त्याच कामासाठी राज्य शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे व विहित कालमर्यादेत मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक आहे. हा निधी इतर दुस-या कोणत्याही कामासाठी वा नगर परिषदेच्या कामासाठी वापरता येणार नाही किंवा वळता करता येणार नाही. विशिष्ट कामासाठी मान्य केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित नगर परिषदेची असेल.

१२. या योजनेंतर्गत प्राप्त होणारा निधी हा राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्या अंतर्गत जमा करावा व बँकेत ठेवलेल्या निधीवर मिळणारे व्याज याच निधीत जमा करावे. या निधीच्या उपयोगितेवर नियंत्रण राहण्यासाठी खात्याचे संचालन मुख्यधिकारी, वाशिम नगर परिषद यांच्याव्दारे करण्यात यावे. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतेवेळी बँकेतील या खात्यावर झालेल्या व्यवहाराच्या नोंदी दर्शविणा-या पासबुकाची साक्षंकित प्रत सोबत जोडण्यात यावी.

१३. योजना पूर्ण झाल्यावर या योजनेंतर्गत निर्माण झालेल्या मालमत्तेपासून किंवा सोयीसुविधांपासून मिळणारे उत्पन्न हे या योजनेसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यातच जमा करण्यात यावे. या उत्पन्नातून तलाव संवर्धनासाठी अतिरिक्त कामे राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या अनुमतीने हाती घेता येतील. मात्र तलावाच्या संवर्धनाच्या कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी हा महसूली निधी वापरता येणार नाही.

१४. मंजूर कामे शासन आदेशाच्या दिनांकापासून/धनादेशाच्या दिनांकापासून २४ महिन्यात किंवा तत्पूर्वी पूर्ण करावयाची आहेत.

१५. मंजूर बाबीतील खर्चामध्ये बचत झाल्यास बचत झालेला निधी योजनेतीलच दुस-या उपांगासाठी राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या परवानगीने वापरता येईल.

१६. राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत निर्माण केलेल्या यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च योजना कार्यान्वित झाल्यानंतर संबंधीत ग्रामपंचायतीने स्वत:च्या निधीतून भागवावयाचा आहे.

१७. योजनेंतर्गत खर्च करण्यात येणा-या रकमेचे लेखे प्रचलित लेखा संहितेनुसारच ठेवण्यात यावेत व त्याचे लेखापरिक्षण स्थानिक निधी व लेखापाल यांच्याव्दारे करण्यात यावे व त्याचा अहवाल पर्यावरण

विभागास पाठविण्यात यावा. तसेच प्रत्येक आर्थिक वर्षा अखेर झालेलया खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधीत महालेखापाल कार्यालयास पाठविण्याची जबाबदारी नगर परिषदेची राहील.

१८ तलावांच्या कामांच्या प्रगतीच्या अहवालाची तसेच खर्चाच्या विवरणपत्राची पर्यावरण विभागाच्या सक्षम अधिका-यांकडून तपसणी करण्यात येईल व तपासणीच्या वेळी नगर परिषदेने आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

१९. संबंधीत नगर परिषदेच्या ह्द्दीतील हॉटेलमधून/लोकवस्तीतून/वाणिज्यिक आस्थापनेतून निघणारे सांडपाणी तलावात जाणार नाही याची जबाबदारी नगर परिषदेची असेल.

२०. योजनेवरील कामासाठी मान्यता प्राप्त झालेल्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च झालेली रक्कम शासनाकडून उपलब्ध होणार नाही. या कामासाठी शासनाने अदा केलेली रक्कम जर त्या कामावर घालून दिलेल्या विविक्षित वेळेमध्ये खर्च होऊ शकत नसेल तर त्यास राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल.

२१.योजनेवरील कामासाठी अदा केलेली रक्कम योग्य रितीने वापरली जात नाही किंवा कामाची योग्य ती प्रगती होत नाही असे शासनाच्या निदर्शनास आल्यास शासन कोणत्याही क्षणी अशा कामांची प्रशासकीय मान्यता रद्दबातल करु शकेल.

२२) राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या परवानगी शिवाय तलावात बोटींगची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. तसेच यांत्रिक बोटींचा वापर तलावात कुठल्याही प्रयोजनासाठी अनुज्ञेय असणार नाही. फक्त पॅडल बोटचा वापर अनुज्ञेय असेल.

२३.तलावात मासेमारी शक्यतो करण्यात येऊ नये. मासेमारी करावयाची झाल्यास फक्त मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यांसाठी परवानगी देण्यात यावी. अशावेळी १० इंच व त्यापेक्षा लहान आकाराच्या माशांना पकडण्याची मुभा देण्यात येऊ नये. स्थानिक परिस्थितीनुसार याबाबत प्रकल्प सनियंत्रण समिती वेळोवेळी निर्णय घेईल.

२४.योजनेवरील कामांसाठी राज्य शासनाच्या अनुदाना व्यतिरिक्त शासनाकडून, वित्तीय संस्थांकडून वा आणखी कोणत्याही संस्थांकडून प्राप्त निधी या योजने अंतर्गत खर्च झाल्याचे दर्शविण्यात येऊ नये. (No Overlapping of schemes)

२५. योजनेचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्यासाठी भेट देणा-या राज्य शासनाच्या अधिका-यांस आवश्यक त्या सर्व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक असेल.

२६. योजनेंतर्गत शासनाच्या अनुदानातून तयार केलेली मालमत्ता, ज्या कामासाठी निर्माण केली आहे, त्याच कामासाठी वापरणे आवश्यक आहे व त्यासाठी ही मालमत्ता अभिलेखित करणे आवश्यक आहे.

२७. योजनेंतर्गत करण्यात येणा-या निरनिराळया कामांचे व समन्वयाचे काम राज्यस्तरावरील सनियंत्रण समितीव्दारे करण्यात येते. या समितीने कामाबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

२८.योजनेंतर्गत नगर परिषदेच्या होणा-या आस्थापनेवरील व लागणा-या मनुष्यबळावरील खर्च संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेव्दारे करण्यात येईल. त्यासाठी या विभागाकडून अनुदान देण्यात येणार नाही.

२९. योजनेंतर्गत तलावातून काढण्यात येणा-या गाळांचे अभिलेख व छायाचित्रांसह पुरावे नगर परिषदेने जतन करावेत. तसेच गाळाच्या विल्हेवाटीची अभिलेखामध्ये नोंद करुन ठेवावी.

३०.तलाव संवर्धनाबाबत मंजूर कामांमध्ये तलावातील गाळ काढणे व सिल्ट ट्रॅप लावण्याच्या कामाचा समावेश असल्यास, तलावाच्या गाळ काढण्याच्या कामाबरोबरच तसेच पावसाळयापूर्वी सिल्ट ट्रॅप लावण्याचे काम पूर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा तलावात पुन्हा गाळ जमा होऊ शकतो.

३१. तलावाच्या कामास सुरवात करण्यापूर्वीची छायाचित्रे विभागास सादर करावीत.

३२. राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटींचे व शर्तींचे पालन करणे नगर परिषदेला बंधनकारक राहील.

३३. योजनेंतर्गत किती लोकांना रोजगार उपलब्ध झाला याची नोंद ठेवावी.

३४. योजना कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक असल्याने योजने करिता कोणतेही एस्कलेशन चार्जेस अनुज्ञेय नाहीत.

३५. योजनेंतर्गत मंजूर कामांच्या निविदा हया शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या विहित प्रक्रियेचा अवलंब करुन स्विकाराव्यात. तसेच प्रकल्पांतर्गत मंजूर किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या निविदा स्विकारण्यात येऊ नयेत.

३६. कॉन्ट्रॅक्टरने विहित वेळेत काम पूर्ण न केल्यास त्यांच्यावर दंड आकारण्याची तरतूद ठेवण्यात यावी.

३७.योजनांतर्गत झालेल्या सर्व खर्चाचा ताळमेळ वेळोवेळी अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई व तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई/ नागपूर यांच्या कार्यालयाशी घालण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची असेल.

३८.योजना पूर्ण झाल्यावर भविष्यात तलावाच्या उपयोगाबाबत व वापराबाबत किंवा तलावासंदर्भात कोणतीही नवीन कामे हाती घ्यावयाची झाल्यास त्यास प्रथम राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची मान्यता घेण्यात यावी.

३९.तलावाच्या क्षेत्राबाबत, मालकीबाबत, राबविण्यात येणा-या कामाच्या गुणवत्तेबाबत तसेच Surface floting wetland beds बाबत वा इतर संबंधित बाबींबाबत भविष्यात काही न्यायालयीन वा अन्य बाबी उदभवल्यास संबंधित नगर परिषद सर्वस्वी जबाबदार राहील.

Shuddhodhan D Aher

Digitally signed by Shuddhodhan D Aher
DN: CN = Shuddhodhan D Aher, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Environment Department
Date: 2019.03.07 18:19:04 +05'30'

शु.द.आहेर
उप सचिव ,पर्यावरण विभाग
महाराष्ट्र शासन